# राज्य शासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती (भाग २)

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नाव | राज्य शासनाची इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या (कला, वाणिज्य,विज्ञान पदवी व पदव्युत्र अभ्यासक्रम) राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना |
| 2 | योजने बद्दल शासन निर्णय | अल्पसंख्यांक विकास विभाग, अविवि-2011/प्र.क्र.44/11/का.6दि.14-ऑक्टोबर 2011 |
| 3 | योजनेचे स्वरूप | राज्य शासनाने अल्पसंख्यांक लोकसमुह म्हणून घोषीत केलेल्या राज्यातील मुस्लीम,बौध्द,ख्रिश्चन, जैन, शीख, पारशी व ज्यू या समाजातील तांत्रिक व व्यावसायिक तसेच इयत्ता बारावी नंतरच्या सर्व अभ्यासक्रमांध्ये शिक्षण घेणाऱ्या ( कला,वाणिज्य,विज्ञान पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम ) राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्याकरिता शिष्यवृत्ती योजना सदर योजनेचे नोडल ऑफीसर संचालक तंत्रशिक्षण हे आहेत. या संचालनालयाकडून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे अर्जानुसार विद्यार्थ्यांची यादी तंत्रशिक्षण संचालनालयकडे पाठविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीची रक्कम तंत्रशिक्षण संचालनालयाकडून विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येते. |
| 4 | योजनेचा उद्देश | अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे |
| 5 | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी (मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शीख, पारशी व ज्यू) |
| 6 | योजनेच्या प्रमुख अटी | 1. इयत्त 12 वी नंतरच्या मान्यता प्राप्त अभ्यासक्रमांमध्ये (कला, वाणिज्य,विज्ञान) प्रथम वर्ष ते अंतिमवर्षात शिकत असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना लागू आहे.<br>2.विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याच्या रहिवासी असावा व त्याने उच्च माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी.<br>3. या योजने अंतर्गत शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्याला अन्य शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन याचा लाभ घेता येणार नाही.<br>4. पालकाचे वार्षिक उत्पन्न हे रु. 8.00 लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे.<br>5. नुतनिकरणासाठी विद्यार्थ्याने पूढील वर्षात प्रवेश घेतलेला असणे आवश्यक आहे.<br>6. या योजनेअंतर्गत 30 % टक्के शिष्यवृत्ती मुलींसाठी राखुन ठेवण्यात येतील.<br>7. जा एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या अधारे शिष्यवृत्ती मिळविली असल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती तत्काळ रद्द करण्यात येईल. |
| 7 | आवश्यक कागदपत्रे | 1. माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणत्र परीक्षा व त्यापुढील परीक्षांमधील गुणपत्रीकेच्या प्रती.<br>2. सक्षम प्राधिकरणाने देलेले अधिवास प्रमाणपत्र.<br>3. सक्षम प्राधिकरणाने देलेले पालकाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.<br>4. महाविद्यालयास चालू वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट.<br>5. विद्यार्थ्यांचे अल्पसंख्यांक असल्याबाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.<br>6. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र. |
| 8 | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रु.5000/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम. |
| 9 | अर्ज करण्याची पद्धत | नवीन मंजुरी व नूतनीकरण यासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| 10 | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |